


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख १ डिसेंबर, १९४८ अंक ४६


## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.


| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ३०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३५,००,००० |

—*यावत् बँकिंग व्यवहार केले जातात*—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी







तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**तामीळ भाषेतील ज्ञानकोश**—तामीळ ज्ञानकोश कमिटी सध्या त्या भाषेतील एक ज्ञानकोश तयार करण्याचें काम करीत आहे. ह्या ज्ञानकोशाचे एकूण बारा भाग होतील. त्या प्रत्येकांत ७५० पृष्ठें असतील. बारा खंडांना मिळून १२ लाख रुपये खर्च येणार आहे. प्रत्येक भागाची किंमत २५ रुपये ठेवण्यांत येईल.

**आयुर्वेदिक कॉलेजला देणगी**—नडियाद येथील महागुजराथ आयुर्वेदिक कॉलेजला एका गुजराथी कंपनीनें ५५ हजार रुपयांची देणगी इमारत बांधण्यासाठी म्हणून दिली आहे. हें कॉलेज आज दहा वर्षे चालू असतांनाहि त्याची स्वतःची अशी इमारत नव्हती. कॉलेजच्या चालकांच्या मालकीची जागा मात्र होती.

**हिंदुस्थानासाठी चिली देशांतील गहूं**—चिली देशानें हिंदुस्थानाला २०,००० टन गहूं पुरविण्याचें कबूल केलें आहे असें समजतें. चिली देशांत स्वतःच्या गरजेपेक्षांही अधिक गहूं पिकला असल्यामुळें पहिला १० हजार टनांचा पुरवठा दुप्पट करण्यांत आला.

**तिबेटच्या राजधानीला वीज**—तिबेटची राजधानी ल्हासा ह्या शहराला विजेचा पुरवठा करण्यासाठी एका धरणाची योजना आखण्यांत आली आहे असें समजतें. विजेची यंत्रसामुग्री ब्रिटिश बनावटीची असून ती प्रथम कलकत्त्याला बोटींतून आणण्यांत येईल. नंतर दार्जिलिंग येथून सुमारें ३९० मैलांचा प्रवास ह्या यंत्रसामुग्रीला खेचरांच्या पाठीवरून करावा लागेल. ल्हासा समुद्रसपाटीपासून १२,००० फूट उंच आहे.

**सिनेमाच्या धंद्यांत आगाखान**—ईगल फिल्म्स ह्या कंपनीशीं, आगाखान आणि त्यांचे चिरंजीव प्रिन्स अली खान ह्यांच्या संचालकत्वाखाली स्थापन झालेल्या एका युरोपिअन कंपनीनें करार केला आहे. ह्या करारान्वयें, कंपनीनें ईगल फिल्म्सला पांच वर्षेपर्यंत दरवर्षी २० लाख डॉलर्स देण्याची हमी घेतली आहे. उलटपक्षीं, ईगल फिल्म्सनें निर्माण केलेले बोलपट फ्रान्स, इटली, स्विट्झरलंड, जर्मनी आणि स्पेन ह्या देशांतून दाखविण्याचे अधिकार आगाखान पुरस्कारित कंपनीला मिळणार आहेत.

**श्री. क्षीरसागर ह्यांचें भाषण**

पूना कमर्शिअल हायस्कूल, बुधवार पेठ, पुणें या संस्थेचें चौथें स्नेहसंमेलन व बक्षिससमारंभ भारत इंडस्ट्रिअल बँक लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. एन. एन. क्षीरसागर यांचे अध्यक्षतेखालीं शुक्रवार दि. २६–११–४८ रोजीं संस्थेचे इमारतींत साजरा झाला. अध्यक्षांनीं आपले भाषणांत 'व्यापारी शिक्षण' या विषयावर उद्बोधक असे विचार प्रदर्शित केले.

## पावसामुळें झालेली नुकसानी कळवा

**पुणें जिल्हा दुष्काळ निवारण समितीचें पत्रक**

"गेल्या आठवड्यांत पुणें जिल्ह्यांत जोराची पर्जन्यवृष्टि होऊन हातीं आलेल्या पिकांना बरीच नुकसान पोहचेल अशी भीति वाटत आहे. पिकाचे नुकसानीबरोबर इतरही नुकसान झालें असल्याचा संभव आहे. अवेळीं झालेल्या जोराच्या पावसानें जी नुकसानी झाली त्याची कल्पना यावी व त्याबाबत अवश्य असल्यास योग्य ती मदत करण्याची तयारी करावी याकरितां आपल्या भागांतील पावसामुळें झालेल्या नुकसानीचा तपशील, त्याचप्रमाणें कोणत्या प्रकारची तातडीची मदत पाहिजे आहे याची संपूर्ण माहिती आमचेकडे शक्य तितक्या लवकर पाठविण्याची कृपा करावी," असें विनंतिपत्रक पुणें जिल्हा दुष्काळ निवारण समितीनें काढलें आहे. समितीची कचेरी भारत सेवक समाज, पुणें ४ येथें असून श्री. आ. गो. आवटे, डॉ. र. गो. काकडे व य. द. खोले हे समितीचे चिटणीस आहेत.

## बँकांतील नोकरांच्या सभा व निवडणुकी

**बॉंबे इं. रिलेशन्स ॲक्टाची अंमलबजावणी**

सोलापूर लेबर ऑफिसर, श्री. एल. सी. जोशी, हे नुकतेच पुणें येथें येऊन गेले. बॉंबे इंडस्ट्रिअल रिलेशन्स ॲक्ट (१९४६) हा बँकिंगच्या धंद्यास लावण्यांत आला आहे हें प्रसिद्धच आहे. त्या कायद्याखालील ४० व्या कानूप्रमाणें, बँकांतील कारकुनांचा गट व इतर नोकरांचा गट अशा गटांचे प्रत्येकीं पांच प्रतिनिधींची निवड; त्याचप्रमाणें बँकेच्या एकूण नोकरवर्गातर्फेच्या पांच प्रतिनिधींची निवड, अशा निवडणुका कांहीं बँकांत सभा भरवून श्री. जोशी ह्यांनीं घडवून आणल्या, असें समजतें. निवडणुकीचे निकाल कायद्याच्या ४२ व्या कानूप्रमाणें बँकांच्या कचेरींत चिकटवून लावण्यांत आले आहेत.

## पुणें युनिव्हर्सिटीची निवडणूक

**नोंदलेल्या पदवीधरांना श्री. येरवडेकर ह्यांची विनंति**

नोंदलेल्या पदवीधरांतर्फे २५ सभासद निवडून देण्यासाठी २० डिसेंबर रोजीं निवडणूक होणार आहे. मला आपण आपलें पहिलें मत द्यावें.

**अनुभव व लायकी**

"१९२६ सालीं एम. ए. मराठी भाषा व मीमांसा शास्त्र ह्यांत अत्युच्च स्थान. "सर लॉरेन्स जेन्किन्स स्कॉलरशिप." ना. गोखले चरित्राबद्दल "परमानंद प्राईझ." वकिलीच्या व्यवसायास प्रारंभ करण्यापूर्वी ना. दा. ठाकरसी महाविद्यालयांत संस्कृत व मराठी प्राध्यापकाचें सवेतन व विनावेतन काम. परीक्षकाचा अनुभव. निरनिराळ्या नियतकालिकांत महत्त्वाच्या विषयांवर लेखन. "व्यापारी महाराष्ट्र"चा मुख्य संपादक. युनिव्हर्सिटीच्या कारभाराचा व घटनांचा अभ्यास. मराठी भाषा व संस्कृति ह्यांचा जाज्वल्य अभिमान."

१२८१, शिवाजीनगर पुणें ५ — द. ग. येरवडेकर एम्. ए., एलएल. बी.


-सर्व प्रांतांतील- सुती – गरम – रेशमी –खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ दमडेरे बोळाजवळ पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. १ डिसेंबर १९४८





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## म्हैसूर संस्थानांतील रेशमाचा धंदा

" हातमागाचें रेशीम व पॉवरलूमचें रेशीम ह्यांत फरक करण्यांत येतो, तो नाहींसा केला पाहिजे. रेशमाच्या धंद्यास ज्यास्त प्रोत्साहन दिलें पाहिजे. परदेशी स्पर्धेपासून त्यास संरक्षण दिलें पाहिजे. रेशमी कापडाची आयात करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे, त्यामुळें हिंदी रेशमाच्या धंद्यावर मरण ओढवेल. " म्हैसूर स्टेट सिल्क मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनची सभा ता. २२ नोव्हेंबर रोजीं म्हैसूरचे दिवाण सर रामस्वामी मुदलियार ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती, त्यावेळीं असोसिएशनचे अध्यक्ष श्री. नारायणराव गोविंद नाईक ह्यांनीं वरीलप्रमाणें इशारा दिला. म्हैसूरी रेशीम अधिक उठावदार करण्याचें महत्त्व सर रामस्वामींनीं प्रतिपादन केलें आणि रेशमी कापड आयात करण्याच्या धोरणाच्या दुष्परिणामाकडे हिंदुस्थान सरकारचें लक्ष वेधण्यांत आलें आहे, असें त्यांनीं सांगितलें. हिंदी रेशमाच्या धंद्यांत म्हैसूरचें स्थान महत्त्वाचें आहे, ह्या दृष्टीनें म्हैसूरचे एक मंत्री राजसेवासक्त पी. सुब्राम पी. चेट्टी ह्यांनीं त्या धंद्याचा घेतलेला ताजा आढावा उद्‌बोधक होईल. म्हैसूर संस्थानांतील सिल्क फिलेचरच्या धंद्याच्या वाढीस श्री. नारायणराव नाईक ह्यांचे परिश्रम कसे कारणीभूत झालेले आहेत, हें महाराष्ट्रीयांना माहीत आहेच.

रेशमाच्या निर्मितींत हिंदुस्थानांत म्हैसूर संस्थान हें अग्रगण्य आहे. संस्थानांतील हवापाणी आणि इतर परिस्थिती ह्या ग्रामोद्योगाला अत्यंत अनुकूल अशीं आहेत. हिंदुस्थानांतील रेशमाच्या उत्पादनापैकीं शेकडा ६० टके उत्पादन म्हैसूर संस्थानांत होतें. देशांत रेशमाचें एकूण वार्षिक उत्पादन २४ लाख पौंड होतें. त्यापैकीं १६ लाख पौंड म्हैसूर संस्थानांत होतें. म्हैसूर सरकारनें ह्या धंद्याला २५ वर्षांवर काळजीपूर्वक मदत केली असून धंद्याची संघटना अद्यावत् पद्धतीची केली आहे. त्यासाठीं एक स्वतंत्र संस्थानी खातेंच उघडण्यांत आलें आहे.

हिंदुस्थानांत रेशमाचें उत्पादन रामायण व महाभारतकालापासून चालू होतें, असें दिसून येतें. तथापि हैदरअल्ली आणि टिपू सुलतान ह्यांच्या कारकीर्दींत दक्षिण चीनमधून रेशमाचा धंदा येथें पुन्हा चालू करण्यांत आला. त्यानंतर १८६५ सालापर्यंत त्याची वाढ होत होती. त्या सुमाराला मात्र रेशमाच्या किड्यांत रोगराई उत्पन्न होऊन धंदा बुडण्याच्या पंथाला लागला होता. जपानमधून नवीन रेशमाचे किडे आणवण्यांत आले आणि हा धंदा तात्पुरता बचावला. तथापि रेशमाच्या किड्यांतील रोग तसाच राहिला. त्यामुळें एखादा हंगाम जरा प्रतिकूल गेला, कीं धंद्यावर त्याचा अनिष्ट परिणाम होई. तथापि नैसर्गिक अनुकूलतेचा इष्ट परिणाम होऊन १८९० च्या सुमारास खुद्द म्हैसूर संस्थानांतील रेशमाचे किडेच पूर्णपणें निरोगी झाले. त्याकामीं जपानमधील आयात केलेल्या किड्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. ह्या धंद्यांतील चढउतारांत १९१४-१५ साल फारच वाईट गेलें. ह्या सालीं रेशमाच्या किड्यांचें अन्न जीं तुतीचीं झाडें त्यांची लागवड अवघ्या २५,००० एकरांवर येऊन ठेपली. त्यानंतर म्हैसूर सरकारनें योग्य उपाय योजून धंदा पुन्हा स्थिरस्थावर केला.

म्हैसूर संस्थानांत शेतीच्या खालोखाल हाच धंदा महत्त्वाचा आहे. त्यासंबंधीं कांहीं आंकडेवार माहिती पुढें दिली आहे.

म्हैसूर संस्थानमधील तुतीच्या झाडांची लागवड

| साल | एकर |
|---|---|
| १९३८-३९ | २७,२०० |
| १९४७-४८ | ८०,००० |

धंद्यांत काम करीत असलेलीं माणसें ( अंदाजी )

| | |
|---|---|
| ( अ ) किड्यांची जोपासना करणारीं कुटुंबें | ५१,००० |
| ( ब ) कोषांतून धागा काढणारीं कुटुंबें | २०,००० |
| ( क ) तुतीच्या झाडांची लागवड व इतर तद्विषयक शेतमजूरी करणारीं कुटुंबें | ८०,००० |
| ( ड ) रेशीम विणणें व त्यांचा व्यापार करणारीं कुटुंबें | २०,००० |

रेशमाचा खप मुख्यतः उत्तर हिंदुस्थानांत होतो. गेले कांहीं महिने त्या बाजूला राजकीय दृष्ट्या अस्थिर परिस्थिति आहे. शिवाय परदेशांतून स्वस्त दराच्या रेशमाची आयात होत आहे. त्यामुळें हिंदुस्थानांतील रेशमाच्या धंद्यावर परिणाम झालेला आहे. मजुरी व अन्नधान्याच्या किंमती ह्यामुळें रेशमाच्या किड्यांचे कोष तयार करण्याचा खर्च वाढला. हिंदी रेशमाला बाजारांत येणारी किंमत मात्र त्याप्रमाणांत वाढली नाहीं. व्यापारी स्पर्धेत धंदा टिकणें कठीण जाऊं लागलेलें पाहून म्हैसूर सरकारनें हिंदुस्थान सरकारला विनंती करून ह्या धंद्याला अधिक संरक्षण देण्याविषयीं टॅरिफ बोर्डामार्फत चौकशी व्हावी अशी मागणी केली. बोर्डानें चौकशीचें काम चालू केलें आहे.

रेशमाच्या किंमती स्थिर करण्याच्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें म्हैसूर सरकारच्या विनंतीप्रमाणें परदेशांतून आयात केलेल्या ८,००० गांठीपैकीं १,२०० गांठी म्हैसूर सरकारला दिलेल्या आहेत. म्हैसूर सरकारला दिलेल्या ह्या रेशमाची किंमत हिंदी रेशमाच्या धंद्याला परवडेल अशी ठेवण्यांत येणार आहे. ह्या रेशमाच्या विक्रीलाही आता सुरवात झाली आहे. सध्या रेशमाचा बाजार मंदावला आहे. कारण, परदेशी स्वस्त रेशीम आयात होणार असल्याच्या वार्ता उठत आहेत. तथापि, बाजार स्थिर करण्याचे उपाय योजण्यांत येत आहेत.

---

**सिलोननें मागणी नाकारली**—रशिआनें सिलोनमधील चालू वर्षीचें रबराचें सर्व उत्पादन विकत घेण्याची मागणी केली होती. ह्या मागणीला सीलोन सरकारनें नकार दिला असें समजतें. इंग्लंड आणि अमेरिका ह्यांनीं ह्या संभाव्य व्यवहाराबद्दल चिंता व्यक्त केली होती. कारण, रबर ही वस्तू युद्धाच्या दृष्टीनें फार महत्वाची आहे.

**कामगारांसाठी घरें**—हिंदुस्थान सरकार देशांतील मजुरांसाठीं १० लाख घरें बांधण्याची योजना तयार करीत असून, तीसाठीं पैशाची व इतर व्यवस्था करण्याचें काम सध्या चालू आहे.

## रेल्वेचे नवे महाग दर

१ जानेवारी १९४९ पासून भारतीय रेल्वेवर वरचा वर्ग, मध्यम वर्ग आणि सामान्य वर्ग असे तीन वर्ग ठेवण्यांत येणार आहेत. वरच्या वर्गास मैलास २४ पै, मध्यम वर्गास मेल एक्सप्रेस गाड्यांस मैलास ९ पै आणि पॅसेंजर गाड्यांस मैलास ७॥ पै आणि सामान्य वर्गास मेल–एक्सप्रेससाठी ५ पै आणि पॅसेंजर गाडीस ४ पै याप्रमाणें दर मुकर करण्यांत आले आहेत.

१ जानेवारी १९४८ रोजीं रेल्वेचे दर वाढले. त्यापूर्वी जी. आय. पी. रेल्वेवरील दर पुढीलप्रमाणें होते:—

(१) पहिला वर्ग—
१ ते ३०० मैलांपर्यंत दर मैलास २४ पै
३०० मैलांच्या पुढें " १८ पै

(२) दुसरा वर्ग—
१ ते ३०० मैलांपर्यंत " १२ पै
३०० मैलांच्या पुढें " ९ पै

(३) इंटर (मध्यम) वर्ग (मेल-एक्सप्रेस)*
१ ते ३०० मैलांपर्यंत " ७½ पै
३०० मैलांचे पुढें " ६ पै

(४) इंटर वर्ग (पॅसेंजर गाडी)
सर्रास दर मैलास ६ पै

(५) तिसरा वर्ग (मेल-एक्स्प्रेस)
१ ते ५० मैलांपर्यंत " ५ पै
५० मैलांचे पुढें " ३ पै

(६) तिसरा वर्ग (पॅसेंजर गाडी)
१ ते ५० मैलांपर्यंत " ४ पै
५० मैलांचे पुढें " ३ पै

नवीन दरांचे बाबतींत चटकन् डोळ्यांत भरण्यासारखी गोष्ट म्हणजे अशी कीं नवीन दर वाढलेले तर आहेतच, पण कितीही मैलांचा प्रवास असो, पूर्वीप्रमाणें अधिक प्रवासासाठी भाड्याचें प्रमाण कमी केलेलें नाहीं. नवीन भाडें किती जाचक आहे याची कल्पना यावी यासाठी ४०० मैलांचें पूर्वीचें आणि नवीन भाडें यांचें तुलनात्मक कोष्टक पुढीलप्रमाणें देतां येईल.

**पूर्वीचें ४०० मैलांचें भाडें**

पहिला वर्ग— ४६ रु. १४ आणे.
दुसरा वर्ग— २० रु. १४ आणे.
इंटर (मेल)— १४ रु. १४ आणे.
इंटर (पॅसेंजर)— १२ रु. ८ आणे.
तिसरा वर्ग (मेल) ६ रु. १२ आणे.
(पॅसेंजर) ६ रु. ८ आणे.

**नवीन दरानें ४०० मैलांचें भाडें**

वरचा वर्ग —५० रुपये.
इंटर (मेल)— १८ रु. १२ आणे.
" (पॅसेंजर)—१५ रु. १० आणे.
सामान्य वर्ग मेल–१० रु. ७ आणे.
" (पॅसेंजर)—८ रु. ६ आणे.

वरील तुलनात्मक कोष्टकावरून हें दिसून येईल कीं, नवीन सुरू केलेला वरचा वर्ग पूर्वीच्या पहिल्या वर्गापेक्षांही महागडा आहे. इंटर वर्ग (मेल) पूर्वीच्या जवळ जवळ दुसऱ्या वर्गाच्या किंमतीचा आहे आणि साधा वर्ग (मेल) पूर्वीच्या जवळ जवळ इंटर (पॅसेंजर) च्या किंमतीचा आहे.

नव्या योजनेंत सरकारनें पहिला वर्ग काढला आहे असें मोठ्या अभिमानानें सांगून लोकांची जबर सहानुभूति मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु वरील तुलनेवरून असा निष्कर्ष काढतां येईल कीं, सरकारनें वस्तुतः पहिला वर्ग काढलेला तर नाहींच नाहीं परंतु तो अतिशय महाग करून तिसरा वर्ग मात्र काढलेला आहे. कारण हल्लींच्या तिसऱ्या वर्गाचें भाडें जवळजवळ पूर्वीच्या इंटर-इतकें आहे. (भारतीय प्रवासी वरून)

**शंका-समाधान**

## नफा झाला, तरी डिव्हिडंड देण्यास पैसा नाहीं.

एका कंपनीस नफा पुष्कळ झाला आहे, परंतु डिव्हिडंड वाटण्याइतका रोख पैसा तिचेजवळ नाहीं. अशा परिस्थितींत, डिव्हिडंड देण्यासाठी कंपनीनें कर्ज काढणें योग्य होईल काय?

अशी परिस्थिति निर्माण होण्यास अनेक कारणें असूं शकतील. कंपनीचा पैसा येण्यांत किंवा स्टॉकमध्यें गुंतून डिव्हिडंड देण्याचे वेळीं तो हातीं येणें कठीण होणें अगदीं शक्य आहे. बँकेकडून ओव्हरड्राफ्ट घेऊन डिव्हिडंड वाटणें व पैसे वसूल होतील त्यांतून बँकेचें कर्ज देऊन टाकणें, ह्यांत गैर कांहीं नाहीं. कंपनीचा व्याप वाढून, नफ्याची रकम खेळत्या भांडवलांत कायमची गुंतली असेल, तर तात्पुरतें कर्ज काढून डिव्हिडंड वाटणें श्रेयस्कर होणार नाहीं. कारण, हें कर्ज फेडणें कठीण जाईल. डिबेंचर्ससारख्या स्वरूपांत पैसे उभारून किंवा शेअर्स खपवून त्या पैशांतून डिव्हिडंड देण्यास हरकत नाहीं. पूर्ण भरणा झालेले नवे शेअर्स वाटण्याकडे किंवा जुन्या शेअर्सवरील कॉलच्या येण्याच्या वसुलीकडेहि नफ्याचा विनियोग करतां येईल. स्टॉकची किंमत मुद्दाम वाढवून किंवा घसाऱ्याची व बुडीत कर्जाची तरतूद न करून अथवा देणें हिशेबांत न घेऊन नफा दाखविला जात नाहींना, हें मात्र काळजीपूर्वक पाहिलें पाहिजे.

## कंपनी कायद्याखालील नवा निवाडा

### तज्ज्ञ हिशेबतपासनिसांची मदत.

कंपनी कायद्याच्या १३० (२) कलमाखाली कंपनीच्या डायरेक्टरांना कंपनीच्या कचेरीच्या वेळांत, कंपनीचीं हिशेब पुस्तकें तपासण्याचा हक्क देण्यांत आलेला आहे. हिशेब तपासणी ही तांत्रिक गोष्ट आहे व त्यांतील ज्ञान संपादन केलेल्या तज्ज्ञांनाच ते नीटपणें तपासतां येतात. तेव्हां हिशेब तपासण्याच्या कामीं डायरेक्टरांना तज्ज्ञ हिशेबतपासनिसांची मदत घेण्याचा हक्क आहे. परंतु या आपल्या कामासाठी डायरेक्टरांनीं जो कोणी हिशेबतपासनीस निवडला असेल त्याजविरुद्ध कंपनीची व्यक्तिगत अशी कोणतीहि वाजवी हरकत असूं नये व या हिशेबतपासनिसांनीं कंपनीच्या हिशेबांच्या तपासणीपासून ज्ञात झालेल्या गोष्टींचा उपयोग अन्य कोणत्याहि कारणासाठी वा व्यक्तीसाठी करूं नये, असें बंधन मात्र त्यांजवर राहतें. अशा प्रकारचा हा हिशेब तपासणीचा अधिकार कोणत्याहि कंपनीनें आपल्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमध्यें जरूर ते नियम घालून काढून घेण्याचा अथवा मर्यादित करण्याचा प्रयत्न करणें बेकायदेशीर होईल, असा मुंबई हायकोर्टानें निर्णय दिला आहे.

(ए. आय्. आर. १९४८ मुंबई ३०१)

पुणें सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह

व्याख्यान ४ थें : ९-११-४८

## सहकारी चळवळीचें सप्तवार्षिक समालोचन

( प्रो. रा. वि. ओतुरकर, एम्. ए. )

"१९३९ ते ४६ हा काल महायुद्धाचा असल्यानें उत्पादकांना हें दिवस तेजीचे गेले. शेतीचे मालास भरपूर किंमत मिळाली व त्यामुळें शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा पुष्कळच कमी झाला. त्यांचेकडील थकबाकीचें प्रमाण पुष्कळच उतरलें. अखिल हिंदुस्थान-मधील शेतकऱ्यांकडे थकून राहिलेल्या १४ कोटी रुपयांपैकी ६ कोटी रुपये वसूल आला. यावरून या कोळांत शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिति बऱ्याच प्रमाणांत सुधारली, असें दिसून येतें. परंतु त्या मानानें मात्र त्यांनीं सोसायट्यांकडे आपल्या ठेवी ठेवल्या असाव्यात असें दिसत नाहीं. कारण, सोसायट्यांच्या खेळत्या भांडवलांत झालेली वाढ त्यामानानें पुरेशी दिसत नाहीं. अशी परिस्थिति कां होऊं शकली याबद्दल रिझर्व बँकेनें चौकशी करून आपली निश्चित निदानें अहवालांत दाखल केलीं असतीं, तर तें जनतेस मार्गदर्शक झालें असतें. सोसायट्यांच्या संख्येंत शे. ४१ व सभासदांच्या संख्येंत शे. ७० एवढी वाढ झाली असतां खेळत्या भांडवलांत फक्त शे. ५४ एवढीच वाढ झाली. शेतकऱ्यांकडील कर्जें वसूल झालीं असतां ती रकम सोसायट्यांनी आपला व्याप वाढवून अन्यत्र गुंतवावयास हा काल योग्य होता. सोसायट्यांनीं केवळ कर्जाची देवघेव यापुढें न करीत राहतां विविध क्षेत्रांत आपली वाढ करून घेतली पाहिजे. रिझर्व बँकेनें सन १९२९ सालीं सोसायट्यांनी आपला कारभार आखडता घ्यावा, असा जो सल्ला दिलेला होता त्यांचा परिणाम कदाचित सोसायट्यांनी आपला व्याप चालू कालखंडांत न वाढविण्याकडे झाला असावा असें वाटतें.

"खेडेगांवांतील सोसायट्यांचे कारभाराकडे पाहतां अद्याप जनतेंत जरूर ती जागृति झाली आहे व या चळवळींतील आधारभूत तत्त्वें जनतेस नीट समजलीं आहेत असें वाटत नाहीं. सबब सरकारनें आजपर्यंतची तटस्थ वृत्ति सोडून देऊन या चळवळीचा योग्यप्रकारें प्रसार आपल्या अधिकाऱ्यांमार्फत करावा.

"काळा बाजार नष्ट होण्यास सहकारी सोसायट्यांची मदत घेऊन त्यांचे मार्फतीनें अन्नधान्य, कापडचोपड वगैरे जीवनास आवश्यक गोष्टींचें पद्धतशीर वांटप व्हावयास पाहिजे व हें वांटप योग्यप्रकारें करण्यास सहकारी संस्था हींच योग्य केन्द्रें आहेत. शेतकऱ्यांनीं उत्पन्न केलेल्या मालास योग्य ती किंमत येण्यासाठी सहकारी विक्री सोसायट्या वांटपाचे कामीं आपल्या प्रांतांत थोडीफार प्रगति झाली आहे. तथापि, ती याहीपेक्षा अधिक व्हावयास पाहिजे.

"जमिनीचे तुकडे एकत्र करण्याचे कामीं पंजाबांत पुष्कळ प्रगति झालेली आहे, परंतु आपणांकडे हा प्रयोग अद्यापि यशस्वी झालेला नाहीं. सबब पंजाबांत कांहीं कार्यकर्ते पाठवून तिकडील माहिती आपल्या शेतकऱ्यांस त्यांचेकरवीं उपलब्ध करून द्यावी व समजून द्यावी. लँड मॉर्गेज बँकेचा कारभारही प्रगतीपर पथावर दिसत नाहीं यास मुख्य कारणें म्हणजे पिकांना आलेली अधिक किंमत व कर्जनिवारण कायद्याची अंमलबजावणी हींही असूं शकतील. सबब, या बँकेच्या उद्देशांत थोडाफार फरक करून त्यांचे पुढें कांहीं विधायक कार्यक्रम ठेवावा.

"सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँकांच्या कारभाराकडे पाहतां त्यांच्या वैयक्तिक व सोसायटी सभासदांच्या संख्येंत वाढ झालेली दिसते. त्यांचें भांडवलही पुष्कळच वाढलें असून त्याचा उपयोग सहकारी सोसायट्या तितका करून घेत नसल्यानें सदर भांडवल या बँकांना वैयक्तिक सभासदांशीं व्यवहार करून गुंतवावें लागलें आहे. तात्विक दृष्टीनें हा व्यवहार सहकारी व्यवहार म्हणतां येणार नाहीं.

"प्रांतिक बँकेचे वैयक्तिक व सोसायटी सभासद आणि तिचें भांडवल यांमध्येंही जिल्हा बँकांप्रमाणें वाढ झालेली आहे. या बँकेनें आपलें स्वरूप शुद्ध करून आपल्याकडील असलेलें जिल्हा मध्यवर्ती बँकेचें काम नवीन स्थानिक बँका निर्माण करून त्यांचेकडे सोपवावें व आपण प्रांताची केन्द्रिय बँक म्हणूनच काम करावें, अशी माझी सूचना आहे."

---

### चिपळूण अर्बन को. बँक लि.

अहवालाचे वर्षी बँकेच्या शेअर भांडवलांत ३,२८० रुपयांची वाढ होऊन तें ७५,४३० रु. झालें. गंगाजळी व इतर निधींची रकम ५२,३०० रु. आहे. म्हणजे, बँकेचें स्वतःचें भांडवल १,२७,७३० रु. आहे. ठेवींची रकम ११½ लक्ष रु. आहे. अहवालाचे वर्षी ठेवींत २½ लक्ष रुपयांची वाढ झालेली आहे आणि ती मुख्यतः सेव्हिंग्ज ठेवींत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. बँकेनें ७½ लक्ष रुपये सरकारी व तत्सम रोख्यांत गुंतवले असून ५ लाखांचीं कर्जें दिलेलीं आहेत. बँकेच्या दापोली व गुहागर ह्या दोन्ही शाखांचें काम समाधानकारक चाललें आहे. बँकेस ८,९८५ रु. निवळ नफा झाला. ५% डिव्हिडंडला ३,७०० रु. लागले. म. गांधी स्मारक निधीस ५०० रु. देण्यांत आले. ( चेअरमनः श्री. बी. जी. खातु, वकील, चिपळूण; मॅ. डायरेक्टरः श्री. ग. वि. भाटवडेकर. )

---

### भिवंडी वीव्हर्स को. सोसायटी लि., भिवंडी ( जि. ठाणें )

अहवालाचे सालअखेर संस्थेचें नांव मोमिन वीव्हर्स असें होतें; मात्र कोणत्याहि जातीच्या अगर धर्माच्या लोकांस सभासद होण्यास बंधन नव्हतें. तो विणकर असावा, एवढेंच बंधन आहे. हें नांव आतां भिवंडी वीव्हर्स असें बदलण्यांत आलें आहे. अहवालाचे सालांत कंट्रोल मालाचा व्यवहार कमी झाला, तरी कंट्रोल व्यतिरिक्त इतर मालाचा व्यवहार वाढविलेला दिसतो. सभासदांना सूत पुरविण्याबरोबरच त्यांना लागणारा मिल स्टोर्सचा माल ( उ. फण्या, वय, धोटे, कच्चें रेशीम ) सोसायटीनें पुरविला आहे. मागील वर्षीप्रमाणेंच अहवालाचे सालांत सोसायटीस 'अ' वर्ग मिळाला आहे. बँकेचें वसूल भांडवल २९,२४५ रु. असून रिझर्व्ह फंड २०,२६१ रु. चा आहे आणि इतर फंडांत ५२,६२५ रु. आहेत. एकूण ताळेबंद २,००,९१२ रुपयांचा आहे. निवळ नफा २१,२२२ रु. झाला. (चेअरमन : श्री. अब्दुल शकूर हाजी लालमहमद; मॅनेजर : श्री. एस. एन. लाठोरे )

---

### मधमाशा-पालक परिषद

बेळगांव जिल्ह्यांतील नांदगड येथील श्रीगांधीग्राम येथें ता. २९ व ३० एप्रिल आणि १ मे, १९४९ ह्या दिवशीं ११ वी अखिल-भारतीय मधमाशा-पालक परिषद भरणार आहे. त्यावेळीं मधमाशासंबंधीचें एक प्रदर्शनहि दाखविण्यांत येणार आहे. स्वागतसमितीच्या अध्यक्षपदीं सुप्रसिद्ध व्यापारी श्री. बी. एस. अर्गवी ह्यांची योजना झाली आहे. अधिवेशनासाठी देशांतील सर्व भागांतल्या प्रसिद्ध व्यक्ती येणार आहेत.

## विक्री-करास प्रधानस्थान मिळण्याची शक्यता.

### मद्रासी विक्री-कर वसुलीवरून मिळालेले निष्कर्ष

( श्री. स. वा. दातार. )

मद्रास प्रांतांत विक्री-कर बसविण्यांत आल्याला आतां १० वर्षें होत आलीं. या दहा वर्षांत विक्रीकरानें आपलें महत्त्व चांगलेंच सिद्ध करून दाखविलें आहे. विक्रीकरामुळें व्यापार मंदावेल अशी तक्रार प्रथमतः पुढें आली होती. गेल्या दहा वर्षांच्या अनुभवावरून ती फोल ठरली असून उलट मद्यपानबंदीमुळें सरकारी उत्पन्नांत आलेली खोट भरून काढण्यास विक्रीकरानें पुरेपूर हातभार लावलेला आहे. मद्यपानबंदीचा प्रयोग सुरू करण्यापूर्वी मद्रास प्रांतिक तिजोरींत ३० कोटींची शिल्लक होती. त्या सर्व शिल्लकीचा मद्यपानबंदीच्या कार्यांत फडशा उडून जाणार अशी भीति व्यक्त केली जात होती. विक्रीकराच्या उत्पन्नामुळें त्या भीतीचें निर्मूलन झालेलें असून प्रांताची शिल्लक सुरक्षित राहिलेली आहे.

### मद्रासी कर-योजना

मद्रासमधील कराची योजना मुंबई प्रांतिक विक्री-कर योजनेहून फार निराळी आहे. मद्रासमधील विक्रीकराची आकारणी विक्रीच्या प्रत्येक व्यवहाराचे वेळीं केली जाते. घाऊक, किरकोळ, ग्रामीण, नागर सर्व प्रकारचे विक्रीव्यवहार करपात्र आहेत. शेती व उत्पादन यांना उत्तेजन व व्यवहारसुलभता देण्यासाठी उद्भूत व उत्पादित पदार्थांची प्रथम विक्री करयुक्त ठेवलेली आहे. कराचा दर बरेच वेळां बदलण्यांत आला. सध्यां सामान्य व्यवहारांत सरसकट एका रुपयास तीन पै हा मूलभूत दर ठरविण्यांत आलेला असून मोटारी, वीजसाहित्य, फिल्म्स वगैरे निवडक विलास (लक्झरी) वस्तूंच्या विक्रीवर मुलभूत दराचे जोडीला जादा आकारणीचा दर ठेवण्यांत आलेला आहे. या जादा आकारणीचा दर रुपयास तीन ते सहा पै आहे. सारांश, मद्रासी विक्रीकर हा खराच विक्रीव्यवहारावरील कर असून प्रत्येक हातबदल वा उलाढाल होतांना तो आकारला जातो; आणि त्यामुळें कर चुकारपणास फारसा वाव सहसा रहात नाहीं.

### छोटे व्यापारी व शेतकरी

वार्षिक विक्री दहा हजारांखालीं असलेले व्यापारी सरकारांत कर भरण्यास जबाबदार नाहींत. त्यामुळें खेड्यापाड्यांतील अगदीं छोटे दुकानदार करानुषंगिक यातायातींतून मुक्त ठेवता आलेले आहेत. त्याचप्रमाणें शेतीपासून झालेली अन्नधान्यादिकांची पैदास प्रथमच्या विक्रीव्यवहारांत मुक्त असल्याकारणानें शेतकरीहि या कराच्या कक्षेंतून मोकळा ठेवण्यांत आलेला आहे. अशाप्रकारें शेतकरी व खेड्यापाड्यांतील केवळ स्वतःपुरतें अन्नधान्य खरेदी करणारा गरीब ग्राहक यांना आवश्यक असलेली सूट देऊन मद्रासी विक्री-कर कायद्यानें बाकीचा सर्व ग्राहकवर्ग करास पात्र ठरविला आहे. जितकी जो ग्राहक खरेदी करील त्याप्रमाणें त्याला कर द्यावा लागेल. अशाप्रकारें ग्राहकांच्या क्रयशक्तीनुसार त्यांच्याकडून कमी अधिक प्रमाणांत या कराची शास्त्रशुद्ध आकारणी होत आहे. शिवाय या कराचा आणखी एक मोठा गुण म्हणजे तौलनिक दृष्ट्या फारच कमी खर्चांत सरकारला या कराचा वसूल मिळत आहे. सरकारकरतां व्यापारी हा कर वसूल करून सरकारांत भरीत आहेत. त्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांना वसुलीवर देखरेख आणि करचुकार व्यवहारांवर जागता पाहरा ठेवण्याचें तेवढें काम मुख्यतः करावें लागत आहे.

मद्रास प्रांताचे विक्रीकराचें उत्पन्न चालू दरानें सध्यां मासिक एक कोटीचें असून करचुकारपणाला परिणामकारक आळा बसेल तर तें वार्षिक १५ कोटींपर्यंत यावयास हरकत नाहीं.

### सवलती

कातडीसारख्या मुख्यतः निर्यात होणाऱ्या मालावर, निर्यात घटूं नये म्हणून फक्त एकवारच कराची आकारणी ठेवलेली आहे. सोन्याच्या विक्रींत नफ्याचें प्रमाण अत्यल्प असतें म्हणून सोन्याच्या विक्रीवर नाममात्र शेंकडा चार आणे विक्रीकर ठेवण्यांत आलेला आहे. उत्पादनास उत्तेजन देण्यासाठीं, उत्पादित मालावर कराची आकारणी करतांना उत्पादनास लागणाऱ्या कच्च्या मालाची खरेदी करमुक्त ठेवण्यांत आलेली आहे. उदाहरणार्थ, तेल गाळण्यासाठीं भुइमुगाच्या खरेदीवर विक्रीकर नाहीं; भुइमुगाच्या तेलविक्रीवर मात्र कर आहे. त्याचप्रमाणें कापडाचे बाबतींत सुद्धां वास्तविक कापसाची अथवा सुताची खरेदी ही करमाफ असावयास पाहिजे होती. परंतु सुतावर मद्रास सरकारनें कर बसवला आहे; मात्र त्याचा दर हलका ठेवला आहे. तागाबाबतींत सुद्धां ताग, तागाचें सूत व दोर आणि पोतीं सर्वांवरच विक्रीकर बसविण्यांत आलेला आहे. मद्रासमधून परदेशीं निर्यात होणाऱ्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या वस्तूंवर कर माफ करण्यांत आलेला आहे.

### तक्रारी

पुष्कळ वेळां व्यापाऱ्यांना स्वतःच्या कमाईतून हा कर भरावा लागत असल्याच्या तक्रारी पुढें आल्या आहेत. उदाहरणार्थ, उपाहारगृहांत दिल्या जाणाऱ्या तयार कॉफी पेयावरील हा कर गिऱ्हाइकांकडून घेतां येत नाहीं, उपाहारगृहवाल्याला तो स्वतःच्या प्राप्तींतून भरावा लागतो, इतकेंच नव्हे तर त्याची त्याजवर दुहेरी आकारणी होते. कॉफी पूड विकत घेतांना तिजवर त्यानें विक्रीकर दिलेला असतो आणि तयार कॉफी पेयाच्या विक्रीवरही कराची आकारणी होते. पालेभाज्या व फळें यांच्या सारख्या विनाशी मालांचे व्यापारांत नुकसानीच्या धोक्याच्या मानानें फायद्याचें प्रमाण फारसें नसतें. त्यासाठी अशा विनाशी मालाच्या व्यापाराचे बाबतींत करपात्र विक्रीचा आंकडा मोठा ठेवून छोट्या व्यापाऱ्यांवरील भार हलका करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु वरील दोन्हीं बाबतींत विक्रीकराची आकारणी हलक्या दरानें केल्यास आवश्यक ती सोय होऊं शकेल अशी सूचना पुढें आली आहे.

### दलाल धंदा

मद्रास प्रांतांत दलाली धंद्यांत सुमारें तीस कोटींचें भांडवल गुंतविण्यांत आलेलें आहे. त्यामुळें दलालांचा प्रश्न प्रथम मोठा अवघड वाटला; दलालांचें व्यापारधंद्यांतील स्थान नाकारण्यासारखें नव्हतें. बरें दलालांकडून मालाची प्रत्यक्ष खरेदीविक्री होत नसल्याकारणानें त्यांच्या सर्वच व्यवहारांवर सरसकट विक्रीकराची आकारणी करणेंहि शक्य नव्हतें. यासाठी दलाल धंद्यास परवाने ठेवण्यांत आले व त्यासाठी फीहि जबर ठेवण्यांत आली. त्यामुळें दलालांची संख्या तीन हजारांवरून दीड दोन हजारांवर घसरली खरी, परंतु खऱ्या दलालधंद्यास मात्र मोकळीकच मिळाली. कोणत्याहि विक्रीव्यवहारांतील विक्रेते व ग्राहक यांचीं नांवें दलालानें एकवार स्पष्टपणें नमूद केली कीं त्याजवर त्या व्यवहाराचे संबंधांत कराची आकारणी होत नाहीं. ( अपूर्ण )

## उद्योगधंद्यांना भांडवल कां मिळत नाहीं ?

सध्या नवीन उद्योगधंद्यांना भांडवल मिळणें अवघड झालेलें आहे. ह्या विषयासंबंधीं मुंबईंतलि एक प्रसिद्ध उद्योगपति सर आर्दे-शीर दलाल ह्यांनीं पुढील विचार एका मुलाखतींत व्यक्त केले:—

“ चांगल्या स्थिर झालेल्या खाजगी उद्योगधंद्यांनाच केवळ नव्हे, तर सरकारला सुद्धा पैसा गोळा करणें अतिशय कठीण झालें आहे. पैसे गुंतविणारे लोक बावरून गेले आहेत. त्यांना धंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाची भीति वाटते. त्याशिवाय नफ्यावर नियंत्रण, कामगारांना नफ्यांत भागीदारी, किमान वेतनासंबंधीं कायदे, मजुरीचे वाढते दर, ह्यांचीही धास्ती त्यांनीं घेतली आहे. मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकार ह्यांचे मंत्री १० वर्षांत भांडवलदारांना नाहींसे करण्याची व कारखाने मजुरांच्या मालकीचे करण्याची भाषा बोलतच आहेत. काळ्या बाजारांत मिळवलेला आणि म्हणून व्यवहारांत न आलेला अफाट पैसा आणि प्राप्तीवरील कराची चौकशी हेंही कारण आहेच.

“देशांत पुरेशी संपत्ति निर्माण होईपर्यंत केवळ सामाजिक तत्त्वज्ञानाचा पाठपुरावा करण्याचें बंद झालें पाहिजे. उद्योगधंद्यांत पैसे गुंतविण्यास उत्तेजन देण्यासाठी भांडवली नफ्यावरील कर आणि वरच्या श्रेणींतील वैयक्तिक उत्पन्नावर जो जबर प्राप्तीवरील कर घेण्यांत येतो त्या दोन्ही बाबतींत फरक व्हावयास पाहिजे. पहिला कर रद्द केला पाहिजे आणि दुसऱ्यांत कपात करण्यांत आली पाहिजे. पोलादाच्या सर्व कंपन्यांनीं आपलें उत्पादन वाढविलें पाहिजे आणि उत्पादनांत अधिक विविधता निर्माण केली पाहिजे. पण दहा वर्षांत राष्ट्रीयीकरण होण्याचा संभव असल्यामुळें पोलादाच्या कंपन्या अशा योजनेला तयार होत नाहींत.”

### दि म्हैसूर किर्लोस्कर लि., हरिहर

वरील कंपनीची सातवी वार्षिक सभा ६ डिसेंबर रोजीं हरिहर ( म्हैसूर संस्थान ) येथ होणार आहे, त्या वेळीं कंपनीचा ३० जून, १९४८ अखेरचा अहवाल सभेस सादर करण्यांत येईल. अहवालाचे वर्षीं कामगारांच्या संपामुळें कारखाना अडीच महिने बंद होता त्यामुळें निवळ नफा कमी ( १,६१३ रु. ) झाला. चालू वर्षीं उत्पादन पूर्ववत् होईल अशी अपेक्षा आहे. पोलाद, पिग आयर्न, इत्यादि कच्चा माल मिळण्याचे कामीं व तयार माल पाठविण्याचे कामीं कंपनीस अडचण भासत आहे, परंतु त्यांत लवकर सुधारणा व्हावी अशी आशा आहे. कंपनीचा ताळेबंद ३५½ लक्ष रुपयांचा असून तिला ठोक नफा ३,९३,८४८ रु. झाला आहे. घसारा २,५०,३९३ रु. काढला आहे. ( मॅनेजिंग एजंटस: मेसर्स किर्लोस्कर बंधू लि.; एक्स ऑफिशिओ डायरेक्टर : श्री. एम. बी. जांभेकर )

**रशिआ–अमेरिका बोलपट–करार**—अमेरिका आणि रशिआ ह्यांच्यांत बोलपटांबाबत झालेल्या करारान्वयें रशिआ वीस–वीस बोलपटांचे गट घेणार असून त्याबद्दल एका रकमेनें किंमत देणार आहे. ह्या बोलपटांतील ध्वनिलेखनांत अगर त्याच्या भाषांतरित मजकुरांत रशिआला कमी–अधिक करण्याची मुभा नाहीं. वाटल्यास कांहीं भाग गाळता मात्र येईल.

**इंग्लंडच्या राजाचें भवितव्य!**—अमेरिकेंत निघणाऱ्या ‘डेली वर्कर’ ह्या वृत्तपत्रानें इंग्लंडला लाभलेल्या नव्या राजाबद्दल अग्रलेख लिहून असा मुद्दा उपस्थित केला आहे कीं, इंग्लंडला भावी राजा मिळाला, परंतु त्या राजाला कांहीं भवितव्य आहे काय ? प्रिन्सेस एलिझाबेथ ह्यांना नुकतेंच पुत्ररत्न झालें त्याबद्दलचा हा अग्रलेख आहे.


दी आदर्श कृषि संस्था लि.
नवग्रही, धुळें.

संस्थेनें गेल्या वर्षीं ६ टक्के डिव्हिडंड दिला
== शेअर विक्री सुरू आहे ==
मुदतीच्या ठेवी स्वीकारणें आहेत.
१८ महिने— ५ टक्के २४ महिने— ५½ टक्के.
ठेवींवर शेअर होल्डर्सना ½ टक्का अधिक व्याज

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★
९६ नारायण पेठ, पुणें २.

दि
बँक ऑफ इंडिया, लि.
स्थापना १९०६
खपलेलें भांडवल :— ३,९६,११,९००.
वसूल झालेलें भांडवल :— १,९८,४५,९५०.
राखीव फंड :— २,४८,४५,९५०.
मुख्य कचेरी :—ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.

इतर शाखा :— मुंबई:— बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. मुंबई नजीक:—बांद्रें व अंधेरी. अहमदाबाद:—भद्र ( मुख्य शाखा), गांधी रोड, इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. कलकत्ता:— क्लाइव्ह स्ट्रीट ( मुख्य शाखा ), बडा बाजार व चौरंघी स्क्वेअर. नागपूर:—किंग्ज वे व इतवारी बाजार. पुणें:— लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज ( कच्छ ), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

लंडन शाखा :— १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.

न्यूयॉर्क एजंट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स :—सर कावसजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ., के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता, श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी.

चालू ठेवीचें खातें:—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शें. एकचतुर्थांश रु. व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षा कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटीवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

बी. एन्. अटल, एजंट, पुणें

## मिठाच्या उत्पादकांना सवलती

### मध्यवर्ती व प्रांतिक योजना

मीठ ही जीवनावश्यक वस्तु आहे. तिच्या पुरवठ्याचे बाबतींत हिंदुस्थान पूर्णांशानीं त्वरित स्वावलंबी व्हावा ह्यासाठी हिंदुस्थान सरकार व्यापक योजना आंखीत आहे. त्या योजनेनुसार मिठाचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यास परवाने देण्यांत येणार आहेत. त्यांचा तपशील अजून निश्चित व्हावयाचा असल्याकारणानें सरकारनें तूर्त छोट्या उत्पादकांना द्यावयाच्या सवलती तेवढ्या जाहीर केलेल्या आहेत. ह्या सवलतींचा फायदा छोट्या उत्पादकांनीं येत्या मोसमांतच घ्यावा अशी सरकारची अपेक्षा आहे. यापुढें कोणाहि व्यक्तीस अथवा व्यक्तिसमूहास आपल्या ताब्यांतील जास्तींत जास्त दहा एकर जमिनींत मीठ तयार करण्यास अथवा खरडून वा खणून काढण्यास परवान्याची आवश्यकता ठेवलेली नाहीं. त्याचप्रमाणें, हें मीठ विक्रीयोग्य असेल तर तें विकण्यासही पूर्ण मोकळीक दिलेली आहे. १९३१ सालच्या गांधी-आयर्विन कराराअन्वयें ग्रामवासी लोकांना स्वतःच्या उपयोगापुरतें मीठ तयार करण्यास वा गोळा करण्यास मोकळीक देण्यांत आली होती; परंतु असें मीठ विकण्यास मात्र मोकळीक नव्हती. ह्यावरून हिंदुस्थान सरकारच्या नव्या योजनेमुळें जनतेस अधिक सवलत मिळणार असल्याचें दिसून येईल. ह्या नव्या सवलतींचा उपयोग करण्यासाठी प्रांतिक सरकारांकडून जमिनीहि देण्यांत येणार आहेत. मिठाच्या उत्पादनास योग्य अशा सरकारी पडिक जमिनी दहा-दहा एकरांचे प्लॉट पाडून होतकरू मीठ उत्पादकांना देण्यांत यावयाच्या आहेत. या प्लॉटची बाजारभावानें ठरेल ती किंमत सरकार घेईल व त्यांजवर जमिनीवरील बिगर-शेतीचा कर द्यावा लागेल. मिठाचा धंदा करणाऱ्या ज्या लोकांजवळ स्वतःच्या जमिनी नसतील त्यांना वरील प्लॉटस प्रथम देण्यांत येतील, नंतर इतरांना देण्यांत येतील. मीठ गोळा करण्यास योग्य अशा ज्या सलग जमिनी असतील त्या शक्य तोंवर सहकारी संस्थांना देण्यांत येतील. गायरानें, भातशेतीच्या जमिनी व सुधराईच्या योजनांखालील जमिनी मात्र मिठागरासाठी दिल्या जाणार नाहींत. या योजनेसंबंधीं अधिक माहिती औद्योगिक सहकार व ग्रामोद्योग खात्याचे जॉइंट रजिस्ट्रार यांजकडे मिळेल. त्यांची कचेरी पुणें येथें भांडारकर इन्स्टिट्यूटजवळ लष्करी बराकींत आहे.

### हिंद-ब्रिटन व्यापार

१९४८ च्या पहिल्या सहामाहीचा, हिंद-ब्रिटन व्यापाराचा आढावा घेतला, तर १९४७ च्या मानानें ह्या व्यापारांत बरीच वाढ होत असलेली दिसून येते. ग्रेट ब्रिटनच्या निर्गतींत यंत्रसामुग्रीचा मोठा भरणा कायम आहे. १९४८ च्या पहिल्या सहामाहींत ग्रेट ब्रिटननें हिंदुस्थानकडे ३ कोटी ८७ लक्ष पौंड किंमतीचा माल पाठविला व हिंदुस्थानचा ४ कोटी, ८६ लक्ष पौंड किंमतीचा माल घेतला. अर्थात्, ह्या आकड्यांत अप्रत्यक्ष आयात-निर्गतीचा हिशेब आलेला नाहीं. ग्रेट ब्रिटनची अप्रत्यक्ष निर्गत ( आगबोट वहातूक, विमा व्यवसाय, इ. ) मोठी असते, हें सुप्रसिद्धच आहे. ग्रेट ब्रिटननें पाठविलेल्या ३ कोटी, ८७ लक्ष रुपयांच्या मालांत १ कोटी, ६३ लक्ष रुपयांची यंत्रसामुग्री आहे. हिंदुस्थाननें निर्गत केलेल्या ४ कोटी, ८६ लक्ष रुपयांच्या मालांत १ कोटी, ४१ लक्ष रुपयांचा चहा आहे.

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार










हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.